# जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर

P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Address - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

पुणे पोलीस


## प्रेसनोट क्र. ६४५ दि.०३/०४/२०२०

### बिबवेवाडी पोलीस ठाणे पुणे शहर
### लॉकडाऊन आदेशाचे उल्लंघन करुन मजुरांना कर्नाटक येथे घेवुन जाणारा ट्रक केला जप्त

दि.०२/०४/२०२० रोजी लॉकडाऊनच्या अनुशंगाने मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री कुमार घाडगे यांचे आदेशान्वये सपोनि श्री पावसे,पोलीस उपनिरीक्षक थोरात,पोलीस उपनिरीक्षक बोराटे सपोफौ पाटील,पोलीस शिपाई म्हस्के असे बिबवेवाडी पोलीस स्टेशनचे हद्दीत पेट्रोलींग करीत असताना रात्रौ २१.३० वा.चे स.नं.६५० अखिल श्री विघ्नहर नगर बिबवेवाडी पुणे या ठिकाणी आले असता सदर ठिकाणाहुन एक ट्रक जात असल्याचे दिसल्याने स्टाफचे मदतीने सदर ट्रक थांबवुन ट्रक चालकास नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव राहुल लक्ष्मण जगताप रा.स.नं.६२६ विद्या निकेतन शाळेजवळ,बिवेवाडी पुणे असे असल्याचे सांगीतले ट्रकची पाहणी केली असता सदर ट्रकमध्ये ३० महिला,४० पुरुष व १५ लहान मुले/मुली बसलेले दिसले तेंव्हा ट्रक चालकास ट्रकमध्ये लोक घेवुन जाण्याचे कारण विचारता त्याने सांगीतले की ट्रकमधील लोक हे मुळ कर्नाटक येथील राहणारे असुन ते पुणे येथे मजुरी काम करतात लॉकडाऊनमुळे त्यांना काम नसल्यामुळे त्यांचे कॉन्ट्रक्टर अरविंद लक्ष्मण पासलकर रा. अनिकेत सोसायटी समोर,बिबवेवाडी पुणे व लेबर ठेकेदार रमेश भानु जाधव रा. विघ्नहर नगर अप्पर बिबवेवाडी पुणे यांनी सदर लोकांना कर्नाटक येथे घेवुन जाण्यास सांगीतले होते.परंतु त्यांचेकडे कर्नाटक येथे जाण्यासाठी कोणत्याही प्रकारचा आदेश किंवा परवाना नसल्याने सदर ट्रक चालक कॉन्ट्रक्टर व लेबर ठेकेदार यांचे विरुध्द बिबवेवाडी पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं.१६३/२०२० भा.द.वि.१८८,२६९,२७०,२७१,२९० राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापण कायदा २००५ चे कलम ५१(ब) व महाराष्ट्र कोविड-२०१९ उपाययोजना चे कलम ११ अन्वये गुन्हा नोंद करुन ट्रक नं.**ग्त्क.१२.ग्ज्र.५६७७** हा गुन्हयाचे कामी ताब्यात घेण्यात आलेला असुन त्यामधील लोकांची पोलीस ठाणे तर्फे राहण्याची व खाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

सदरची कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री कुमार घाडगे यांचे मार्गदर्शना खाली सपोनि श्री पावसे,पोलीस उपनिरीक्षक थोरात,पोलीस उपनिरीक्षक बोराटे सपोफौ पाटील,पोलीस शिपाई म्हस्के यांनी केलेली आहे.



